दैनिक जनप्रवास बातम्यांचा राजा
• कोल्हापूर, शुक्रवार
दि. १२ जून २०२६

# विभागीय सहसंचालक कार्यालय परिसरात २५१ वृक्षलागवड

**जनप्रवास : कोल्हापूर**

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त कोल्हापुरात विभागीय सहसंचालक कार्यालयाच्या परिसरात २५१ वृक्षलागवड करण्यात आली. कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांच्या हस्ते उपक्रम घेण्यात आला. ६७ विविध प्रजातींच्या वृक्षांचे रोपण करण्यात आले.

मंत्री चंद्रकांत पाटील यांचे नावाने वडाचे झाड लावले असून, त्याचे नामकरण छत्र-छाया वृक्ष असे करण्यात आले. कुलगुरु यांचे नावे वृक्ष लावण्यात आले, त्यास कुलगुरु वृक्ष असे नामकरण करण्यात आले.

विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण, कोल्हापूर) डॉ. प्रकाश बच्छाव यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी या विशेष उपक्रमाची पूर्वपीठिका विशद करताना ६७ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून ६७ प्रजातींची निवड करण्यामागचा उद्देश आणि २५१ वृक्षलागवडीचे सविस्तर नियोजन यावर प्रकाश टाकला.

डॉ. कामत म्हणाले, मंत्री पाटील यांनी राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि गरजू मुलींना उच्च शिक्षणाचे दरवाजे खुले करून देण्यासाठी घेतलेला 'मुलींना मोफत शिक्षण' हा निर्णय अत्यंत ऐतिहासिक आणि क्रांतिकारी ठरला आहे. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी प्रवीण कोडोलीकर उपस्थित होते. विद्यार्थ्यांचे मोलाचे योगदान आणि श्रमदानः या संपूर्ण वृक्षलागवड मोहिमेमध्ये विविध महाविद्यालयांच्या राष्ट्रीय सेवा योजना आणि राष्ट्रीय छात्र सेनाच्या विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्साहाने आणि श्रमदानातून मोठे साहाय्य केले. राजाराम कॉलेज, राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, न्यू कॉलेज, विवेकानंद कॉलेज, गोपाळ कृष्ण गोखले कॉलेज, धनंजयराव गाडगीळ कॉलेज, भोगवती कॉलेजने सहभाग नोंदवला. या पर्यावरणपूरक कार्यक्रमाला विद्यापीठाचे अधिकारी, विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते.

